वाचले:- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक NGT-२०१८/प्र.क्र.२/तां.क.३, दि.१३/१२/२०१८.

क्र.साशा/अेआरके/कावि/२०१९/ 334
जिल्हाधिकारी जळगांव यांचे कार्यालय,
जळगांव
दि. 02/06/2019

आदेश-

देशातील नद्यांच्या प्रदूषित पट्टयांबाबत दि.१७/०१/२०१८ रोजी दैनिक "द हिंदू" मध्ये प्रसिध्द वृत्ताच्या अनुषंगाने मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या मुळ अर्ज क्र. ६७३/२०१८ दाखल करुन घेण्यात आला होता. मा. लवादाने सदर प्रकरणी दिनांक २०/०९/२०१८ रोजी आदेश पारित करतांना संपूर्ण देशामध्ये ३५१ प्रदूषित पट्टे असून सदर प्रदूषित पट्टयांचे वर्गीकरण प्राधम्य क्र. I ते IV प्रकारामध्ये केले आहे. त्यामध्ये राज्यातील एकूण ५३ प्रदूषित पट्टयांचा समावेश करण्यात आला असून सदर ५३ प्रदूषित पट्टयांमधील ९ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. १, ६ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. ११, १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक III, १० प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. IV व १४ प्रदूषित पट्टे प्राथम्य क्र. V मध्ये समाविष्ट आहेत. जळगांव जिल्हयातील नद्यांचे प्रदूषित पट्टे प्राथम्य क्रमांक III व IV मध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहे.

मा. हरीत लवाद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरीता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करण्याकरीता नदी पुनरुत्थान समिती, पर्यावरण सनियंत्रण कार्यदल नियुक्त करण्याचे आदेश उपरोक्त शासन निर्णयानुसार देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रदूषित नदीपट्टयांमधील प्रदूषण रोखण्याकरीता जळगांव जिल्हयासाठी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दल **(Special Environment Surveillance Task Force)** ची स्थापना मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या मान्यतेने खालीलप्रमाणे करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कृती दलाचे सदस्य |
|---|---|
| १ | उप-जिल्हाधिकारी, रो. ह. यो., जळगांव |
| २ | पोलीस निरिक्षक, जिल्हा विशेष शाखा, जळगांव |
| ३ | उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव |
| ४ | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगांव |

उपरोक्त समितीच्या सदस्यांमध्ये समन्वय साधणे, वेळ प्रसंगी क्षेत्र भेटीचे नियोजन करणे, बैठकांचे आयोजन करणे व निर्णयांची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबात कार्यवाही करण्याची जबाबदारी उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव यांची राहील.

जिल्हाधिकारी, जळगांव

प्रत:
(१) उप-जिल्हाधिकारी, रो. ह. यो., जळगांव
(२) पोलीस निरिक्षक, जिल्हा विशेष शाखा, जळगांव
(३) सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जळगांव

जिल्हाधिकारी, जळगांव